- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, १० ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४२ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,२१० /-
- २३ कॅरेट : १,४६,६०० /-
- चांदी : २,३२,८००/-

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# मनोज जरांगेची बावनकुळेंवर व्यंगात्मक टीका
## म्हणाले, हडप्पा संस्कृती अन् अजंठा लेणीप्रमाणे दिसणारा प्राणी

**वृत्तसंस्था, सोलापूर**
मराठा आरक्षणाचे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी संध्या मराठा आरक्षण आणि जात प्रमाणपत्र रद्द संदर्भाने दौरा करत आहेत. कालपासून ते सोलापूर दौऱ्यावर असून आज पंढरपुरातूनही त्यांनी राज्यातील सत्ताधारी नेत्यांवर हल्लाबोल केला. यावेळी, भाजप नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही टोकाची टीका केली. बावनकुळे हे नाव कधी ऐकलंच नाही, मुळव्याध ऐकलं आहे. आमचं कुळ तर ९६ कुळ आहे, हे बावनकुळ कुठनं काढलं. बावनकुळे प्राणी असा विचित्र दिसतो.
पूर्वीच्या हडप्पा संस्कृतीमधील मोहानजोदाडो प्रमाणे व अजंठातील लेणीप्रमाणे हा माणूस दिसतो, अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा चंद्रशेखर बावनकुळे यांच्या व्यंगावर लक्ष केले.
पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथे आज जरांगे पाटील यांची सभा झाली. यावेळी जरांगे पाटील यांनी बावनकुळे यांच्यावर टीका केली, हडप्पा संस्कृती व अजंठा लेणीप्रमाणे बावनकुळे हा प्राणी दिसतो, तुम्हाला तुमचा नेता प्रिय असेल पण आमची जात आमचा बाप आणि समाज हाच पक्ष असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले. आपण वर्षभर मुंबईतील आंदोलनापासून फडणवीस यांच्यावर बोललो नाही. पण, बावनकुळे जर आमची प्रमाणपत्र रद्द करणार असेल तर आम्ही बोलू.
तुम्हाला तुमचा नेता प्रिय आहे. पण आमची जात, आमचा बाप, तर समाज आमचा पक्ष आहे. आम्हाला दुसरे कोणी मोठे नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी बावनकुळे यांना पुन्हा एकदा पंढरपुरातून जोरदार टीका केली.




दरम्यान, कुणबी प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रकरणावरून मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. "बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले असून त्यांची नार्को टेस्ट करावी," अशी मागणी जरांगेंनी केली होती. या आरोपांवर आता चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सविस्तर प्रतिक्रिया देत आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचा दावा केला. तसेच, मी नार्को चाचणीसाठीही तयार असल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

**मनोज जरांगे पाटलांना उत्तर देणार : हाके**
मनोज जरांगे मुर्खासारखा धिंगाणा घालत महाराष्ट्रात फिरतोय मंत्र्यांची मुख्यमंत्र्यांची आई माई काढतोय ओबीसीच्या मंत्र्यांच्या व्यंगावर टिंगल करतोय त्याच्या विरोधात ओबीसीची वजन मोठ बांधण्यासाठी उद्या मी सोलापुरात येत आहे अशा पद्धतीचा व्हिडिओ लक्ष्मण हाके यांनी सोशल मीडियात पोस्ट केला असून आज हाके सोलापुर जिल्ह्यातून बाहेर पडत असताना उद्या आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सोलापूर मध्ये सर्व बांधवांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

### ...तर जरांगेंच्या आधी मीच अधिकाऱ्यांचा कार्यक्रम करणार : नितेश राणे

मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या प्रमाणपत्राबाबत काही विषय मांडतायेत ते चूक नाही. मी ही मराठा समाजाचा आहे. तरुण तरुणीवर अन्याय होतं असेल तर मीही पेटून उठणार असल्याचं वक्तव्य मंत्री नितेश राणे यांनी केलं. त्या प्रक्रियेमधील अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे आमच्या मराठा समाजाच्या मुलांमुलींचं नुकसान होतं असेल तर मनोज जरगेंच्या आधी मीच त्यां लोकांचा कार्यक्रम करेन असा इशारा नितेश राणेंनी दिला आहे.



मनोज जरागे भांडतायत, भूमिका घेतायेत, समाज हिताच आहे. समाज बांधव म्हणून मी त्यांना एक विनंती करणार किंवा आवाहनन करेन की, ज्या पद्धतीने भाजपच्या प्रमुख नेत्याच्या संदर्भात जी भाषा वापरतायत ती चुकीची आहे. काही सडके आंबे असतील त्यांना आम्हीही सोडणार नाही. त्यांनी बावनकुळे बद्दल विरोधात बोलणे. अन्य नेत्याबदल विरोधात बोलण योग्य नाही. मराठा समाजाच्या मुलांमुलीवर अन्याय झाला असेल तुमच्या खांद्याला खांदा लावून नितेश राणे त्या अधिकाऱ्यांच्या विरोधात भूमिका घेईन किंवा त्याचा कार्यक्रम करायला मी तयार आहे. मात्र भाषेबद्धल त्यांनी विचार करावा असे नितेश राणे यांनी सांगितले.

**थोडक्यात**

### अमरनाथ यात्रा स्थगित
**श्रीनगर** : अमरनाथ यात्रा संपण्यास काही आठवडे बाकी असतानाच स्थगित करण्यात आली आहे. प्रतिकूल हवामान आणि भाविकांच्या संख्येत झालेली लक्षणीय घट यामुळे अमरनाथ यात्रा स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यंदा ४.७ लाखांहून अधिक भाविकांनी अमरनाथचे दर्शन घेतले. बहुतांश भाविक यात्रेच्या पहिल्या तीन आठवड्यांत आले होते, मात्र २३ जुलैपासून भाविकांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. भाविकांची संख्या अत्यंत कमी झाल्यामुळे यात्रा स्थगित करण्यात आली आहे. रविवारी जम्मूवरून भाविकांची कोणतीही नवीन तुकडी आली नाही. तसेच हवामानाबाबत इशारा देण्यात आला असून, मार्गावरील दुरुस्तीचे कामही करणे आवश्यक आहे. त्यामुळे यावर्षीची यात्रा आता संपली आहे, असे आपण म्हणू शकतो, असे कश्मीरचे विभागीय आयुक्त अंशुल गर्ग यांनी सांगितले.

### सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न उधळला
**अमृतसर** : भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर बीएसएफने घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला. भारतात घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशयिताला बीएसएफने गोळ्या घालून ठार केले. अमृतसरमधील दाओके गावात काटेरी कुंपणाजवळ घरिंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. मृताकडे कोणतीही कागदपत्रे न सापडल्याने त्याची ओळख पटू शकली नाही. बीएसएफच्या जवानांच्या तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ७०० मीटर लांब तिरंग्याची भव्य रॅली



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूरः** 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या जयघोषाने नागपूर शहरातील प्रमुख चौक दुमदुमून गेले. निमित्त होते केंद्र शासनाच्या 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्यावतीने रविवारी आयोजित भव्य 'तिरंगा रॅली'चे. क्रांती दिनाचे औचित्य साधत देशभक्तीच्या वातावरणात निघालेल्या या रॅलीने संपूर्ण शहराचे देशभक्तीपर वातावरण निर्माण केले. रामनगर चौकातील बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यापासून या रॅलीची सुरुवात झाली. महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला मार्गस्थ करण्यात आले. रामनगरहून निघालेली ही रॅली लक्ष्मी भुवन चौक मार्गे शंकर नगर चौकात पोहोचली. या रॅलीचे मुख्य आकर्षण म्हणजे तब्बल ७०० मीटर लांब तिरंगा होता, जो नागरिकांच्या शिस्तबद्ध सहभागाने एका लांब प्रवासात झळकत होता. (उर्वरीत वृत्त पान ४ वर)

## भीषण अपघातात ६ मित्र ठार

**वृत्तसंस्था, धार**
मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात बदनावर-उज्जैन फोरलेन हायवेवर रविवारी एक भीषण अपघात झाला. या अपघातात सहा तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी एकच्या सुमारास पंचकवासा गावाजवळ हा अपघात झाला. एका भरधाव आणि अनियंत्रित ट्रकने समोरून येणाऱ्या इको व्हॅनला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की व्हॅनचा अक्षरशः चक्काचूर झाला.
या अपघातात व्हॅनमध्ये प्रवास करणाऱ्या सहाही तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. जखमी तरुणाला उपचारासाठी बदनावर येथील नागरी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. व्हॅनमधील सर्व तरुण गुजरातच्या वडोदरा येथील रहिवासी होते. उज्जैन येथे भगवान महाकालचे दर्शन घेऊन ते व्हॅनने गुजरातला परतत होते. त्याच वेळी समोरून रॉंग साईडने येणाऱ्या ट्रकने त्यांच्या व्हॅनला धडक दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघाताची माहिती गोळा करून अपघातग्रस्त वाहनं हटवली.
अपघातामुळे महामार्गावर काही काळ भीतीचे आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच घटनास्थळी स्थानिकांची मोठी गर्दी जमल्याने वाहतूक कोंडी झाली होती. सध्या पोलिस या अपघाताचा सखोल तपास करत आहेत. महाकाल दर्शनानंतर आपल्या घरी वडोदराला परतणाऱ्या या तरुणांवर काळाने घाला घातला. या अपघातामुळे कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे.

# पालकमंत्र्यांच्या जनता दरबारात गाजले दगडी चाळ गँगवार प्रकरण
### पोलीस आयुक्तांना तात्काळ कारवाईचे निर्देश, सोमवारी दुपारी पोलीस आयुक्त कार्यालयात बैठक, खापरखेडा परिसरातील अवैध धंदे अन् 'एमडी' विक्री विरोधात नागरिकांचा एल्गार, १२ ऑगस्टला विशेष ग्रामसभेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**
मुख्य बाजारपेठेत घडलेल्या दगडी चाळ गँगवार प्रकरणाचे पडसाद आता राजकीय वतुर्ळात उमटू लागले आहेत रविवारी पार पडलेल्या पालकमंत्र्यांच्या जनता दरबारात दगडी चाळ गँगवार मुद्दा चांगलाच गाजला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घटनेची गंभीर दखल घेत शहर पोलीस आयुक्तांना गुन्हेगारांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.
यासंदर्भात सोमवारला दुपारी ३ वाजता शहर पोलीस आयुक्त कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले असून पालकमंत्री बावनकुळे स्वतः या बैठकीला उपस्थित राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.
२ ऑगस्टच्या रात्री खापरखेडा मुख्य बाजारपेठेत तलवार, चाकू व फावड्यांचा वापर करून तीन तरुणांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. सदर घटनेत हिमांशू कडू, रोहित मेश्राम व रक्षित कापसे हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत या घटनेमुळे खापरखेडा परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
सदर प्रकरणात शहर गुन्हे शाखा व खापरखेडा पोलिसांनी नऊ आरोपींना अटक केली असून मुख्य सूत्रधारासह डझनाच्या वर आरोपी फरार झाले आहेत फरार आरोपींचा शोध सुरू आहे.
खापरखेडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत पोलिसांच्या आशीवार्दाने सर्रास अवैध धंदे व एमडी सारख्या अमली पदाथार्ची विक्री सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे यामुळे तरुण पिढी उद्धवस्त होण्याच्या मार्गावर आहे अवैध धंदे व सूडभावनेतून २ ऑगस्टला गँगवार घडल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे.
भानेगाव, खापरखेडा, पोटा चनकापूर व रोहना परिसरातील स्थानिक राजकीय नेते, आजी-माजी सरपंच व व्यापारी यांची संयुक्त बैठक रविवारी पार पडली. यामध्ये खापरखेडा परिसरातील अवैध धंदे व एमडी विक्री कायमचे बंद करण्यासाठी निर्णय घेण्यात आला. १२ ऑगस्ट बुधवारला सर्व ग्रामपंचायत अंतर्गत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर ग्रामसभेत अवैध धंदे व एमडी विक्री संदर्भात सर्वसंमतीने ठराव मंजूर केले जाणार आहेत. सदर मंजूर ठराव मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, पालकमंत्री, स्थानिक आमदार, जिल्हाधिकारी, शहर पोलीस आयुक्त, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना सादर करण्यात येणार असून कठोर कार्यवाहीची मागणी केली जाणार आहे.

### खापरखेडा गँगवारप्रकरणी आरोपींच्या घरांवर रात्री पोलिसांची झडती
**नाग मंदिर रेल्वे चौकीपासून तीन आरोपींना पायदळ घरापर्यंत नेले, पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात**



खापरखेडा मुख्य बाजारपेठेतील गँगवार व प्राणघातक हल्ला प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी तीन आरोपींच्या घरांची रविवारी रात्री खापरखेडा पोलिसांनी झडती घेतली. सुदामा चाफाडहाके (वय २६, रा. वॉर्ड नं. २), शांतनू ऊर्फ दद्दू बागडे (वय १९, रा. वॉर्ड नं. १, चिचोली) आणि जीतू कनोजिया (वय २६, रा. वॉर्ड नं. १, विद्या विहार शाळेजवळ, खापरखेडा) यांच्या घरांवर ही कारवाई करण्यात आली. रात्री नाग मंदिर रेल्वे चौकी येथून पोलिसांनी तिन्ही आरोपींना त्यांच्या घराच्या दिशेने नेले. पुढे वाहन जाण्यास मार्ग नसल्याने आरोपींना पोलिसांच्या बंदोबस्तात पायदळ घरापर्यंत नेण्यात आले. त्यानंतर त्यांच्या घरांची झडती घेण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी परिसरात तैनात होते. रात्रीच्या वेळी झालेल्या या कारवाईमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.
पोलिसांकडून घरातील विविध ठिकाणी झडती घेण्यात आली. मात्र, या झडतीदरम्यान नेमके काय आढळले, कोणते साहित्य किंवा पुरावे जप्त करण्यात आले का, याबाबत पोलिसांकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. या प्रकरणात आतापर्यंत ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र, मुख्य सूत्रधारासह डझनहून अधिक आरोपी अद्याप फरार असल्याची माहिती आहे. त्यामुळे अटक आरोपींच्या घरांची झडती घेण्याबरोबरच फरार आरोपींचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. मुख्य बाजारपेठेत झालेल्या या प्राणघातक हल्ल्यानंतर खापरखेड्यात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आता नऊ आरोपी अटकेत असतानाही मुख्य सूत्रधारासह डझनहून अधिक आरोपी फरार असल्याने इतक्या मोठ्या संख्येने आरोपी पोलिसांच्या हाती लागण्यापासून दूर कसे राहिले, असा सवाल नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. अटक आरोपींच्या घरांची झडती घेण्यात आली. आता फरार आरोपींच्या मुसक्या कधी आवळणार? मुख्य सूत्रधारासह फरार असलेल्या आरोपींपर्यंत पोलिसांचा तपास कधी पोहोचतो, याकडे खापरखेडावासीयांचे लक्ष लागले आहे.

संपादकीय लेखणीतून...

# स्त्री-पुरुष सर्वांचा आंदोलनात सहभाग!

८ ऑगस्ट १९४२रोजी रात्रीपासूनच भारतीय स्वातंत्र्य लढ्याची मनसुबे तयार झालीत. महात्मा गांधीजींनी छोडो भारत व करेंगे या मरेंगेचा नारा दिला होता. यामुळे संपूर्ण देश पेटून उठला. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणाऱ्या काँग्रेस आणि नेत्यांनी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे हा क्रांतीदिन म्हणून पुढे ओळखला जाऊ लागला. ८ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईतील शेवटचा दिवस म्हणूनही स्मरण केला जातो. म.गांधींच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलनाला या दिवशी सुरुवात झाली होती. त्यानंतर ९ ऑगस्ट रोजी गांधींसह ज्येष्ठ नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण भारत इंग्रजांविरुद्ध एकवटला होता. देशावासियांच्या या एकजुटीने इंग्रज सरकारला गुडघे टेकायला भाग पाडले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतर क्रांती दिन साजरा केला जाऊ लागला. मुंबईतील ज्या मैदानावर झेंडा फडकावत या आंदोलनाला सुरुवात झाली होती. त्या मैदानाला क्रांती मैदान हे नाव देण्यात आले आहे. भारतीयांनी पुकारलेला सन १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता.

देशभरात ब्रिटिश सत्तेला हाकलून लावण्यासाठी पुढे आंदोलनांना सुरवात झाली. ब्रिटिश सत्ता पार हादरून गेली होती. हे रोखायचे कसे? असा प्रश्न त्यांना पडला होता. अशात हे आंदोलन देशभर पसरणार म्हणून ९ ऑगस्टच्या पहाटेच म.गांधी, पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यासह अनके काँग्रेस नेत्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. भारतीय जनमानसात असंतोषाचा विस्फोट झाला, त्यामुळे ब्रिटिश शासन भयभीत झाले. एकाच वेळी देशभर कारवाया सुरू झाल्या व महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना अटक सत्र सुरू केले अनेक नेते भूमिगत झाले. देशभर पोलीस ठाण्यावर व मामलेदार कचेरीवर, सरकारी कार्यालयांवर मोर्चे निघू लागले. युवक हातात तिरंगा झेंडा घेऊन घोषणा देत लाठीचार्ज व गोळीबार झेलत धैर्याने तिरंगा फडकवू लागले. समाजवाद्यांनी भूमिगत कारवायांवर लक्ष केले. रेल्वे स्थानके मोडतोड, रूळ उखडणे, पोस्ट कार्यालय जाळणे, वीज तोडणे, गनिमी पद्धतीने ही कामे सुरू झाली. पोलिसांकडून अटक सत्र सुरू झाले. व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार, सामान्य नागरिक, स्त्री-पुरुष सर्व या आंदोलनात सहभागी झाले. देशभरातील युवकांनी यात भाग घेतला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्फूतीर्दायी ठरलेल्या या दिवसाची आठवण तसेच नव्या पिढीला क्रांतिकारकांच्या त्यागाची जाणीव रहावी, यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा केला जातो.

देशभर स्वातंत्र्याचे व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. चले जावमुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महाराष्ट्रात प्रतिसरकारची स्थापना केली. हे आंदोलन उभे राहण्याआधीच ब्रिटिश सरकारने मोडून काढण्याचे ठरवले होते. त्या पद्धतीने देशभर कारवाया केल्या व आंदोलन मोडून काढले. परंतु या आंदोलनाने जगाला वेगळी ओळख दिली. कारण कोणताच सेनापती नसताना स्वातंत्र्याचे युद्ध जनतेने हातात घेतले होते. यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचा विचार केला जाऊ लागला, हे विशेष. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दि.९ ऑगस्ट १९४२ या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी तत्कालीन काँग्रेसच्या नेतृत्वाने भारतातील इंग्रज सरकारला चले जावचा इशारा दिला. या दिवसापासून स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भारतीयांनी करेंगे या मरेंगे अशी निर्वाणीची भूमिका घेतली. इंग्रजांना छोडो भारत हा अखेरचा इशारा दिला होता. या आंदोलनाला गांधीजींनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबई अधिवेशनात सुरूवात केली होते. यामुळे जणू एक क्रांतीची जोतच पेटली होती. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान देणाऱ्या सर्व थोर पुरूषांना विनम्र अभिवादन!

देशभरात ऑगस्ट क्रांती दिन साजरा होत आहे. इंग्रजांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाला सुरुवात झाली होती. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वतंत्र करणार असल्याचे इंग्रजांनी म्हटले होते. मात्र ऐनवेळी इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे म.गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला भारत छोडो, असे नाव देण्यात आले होते. करो या मरो, अशी या आंदोलनाची घोषणा होती. शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्याचे आंदोलन करणाऱ्या काँग्रेस आणि थोर नेत्यानी प्रथमच क्रांतीची भाषा वापरली होती. त्यामुळे ९ ऑगस्ट हा दिवस क्रांतिदिन म्हणून ओळखला जाऊ लागला. मात्र, इतकी कठोर भूमिका घेतल्या नंतर पाच वर्षानी आपल्याला स्वातंत्र्य लाभले. दि. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ ऑगस्ट १९४७ हा कालावधी प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवायला हवा, इतका तो ऐतिहासिक आणि महत्त्वाचा आहे. दरम्यान, गांधींच्या नेतृत्वात इंग्रज सरकारविरुद्ध फार मोठ्या प्रमाणावर देशभर अहिंसक जनआंदोलन लवकरच उभे राहील, अशा शब्दांत महासमितीने आपला निर्धार व्यक्त केला होता. त्यामुळेच गांधी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, अशा ज्येष्ठ नेत्यांना ९ ऑगस्टच्या पहाटेच इंग्रज सरकारने अटक करून अज्ञातस्थळी रवाना केले होते. सरकारने त्यांना कुठे ठेवले याची गुप्तता पाळली होती. मात्र, तरी बातमी फुटलीच. गांधीजींना पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये आणि नेहरू, पटेल, आझाद या मंडळींना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आल्याचे समजले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आले. सरकारने लोकांना एकत्र जमण्यास बंदी घातली. पण लोक आता आदेश मानायला तयार नव्हते. पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले. यासर्व प्रकाराला सरकारने गांधीजींना जबाबदार ठरवले. त्याचा निषेधार्थ गांधीजीने २१ दिवसांचे अंदोलनही केले होते. प्रतिसरकारमुळे मूळ सरकार खवळेले आणि त्यांनी दडपशाही सुरू केली. त्यात हजारांहून अधिक मृत्यू, तितकेच जखमी, महिलांची विटंबना तर लाखोंना अटक केली होती, अशा नोंदी आहेत. ही चळवळ युद्धासारखी होती. या लढाईत योगदान देणाऱ्या सर्व प्रकारच्या क्रांतिलढ्यांना वंदन!

दुसऱ्या महायुद्धात भारताने इंग्रजांना मदत केली. त्यावेळी इंग्रजांनी भारत सोडून जाण्याचे वचन दिले होते. मात्र ऐनवेळी दिलेला शब्द न पाळता इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्यास नकार दिला. त्यामुळे दि.८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबईतील अधिवेशनात भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यानंतर इंग्रजांनी गांधींजींना पुण्यातील आगा खाँ तुरुंगात कैद केले. तसेच, स्वातंत्र्य चळवळीतील इतर नेत्यांनाही अटक करण्यात आली. त्यावेळी तरुण कार्यकर्त्या अरुणा असिफ अली यांनी ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील ग्वालिया टँक मैदानात तिरंगा फडकावत भारत छोडो आंदोलनाचा शंखनाद केला.

# दानाची नवी दिशा : श्रद्धा ते मानवी विकास

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय संस्कृती आणि सामाजिक रचनेत दान या संकल्पनेला अत्यंत पवित्र, उच्च आणि अनन्यसाधारण स्थान देण्यात आले आहे. अनादी काळापासून मानवी मनातील करुणा, त्याग, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीची भावना दानाच्या माध्यमातून व्यक्त होत आली आहे. विशेषतः धार्मिक स्थळांवर भाविकांनी अत्यंत अथांग श्रद्धेने दिलेले दान हे केवळ एका धार्मिक विधीचा भाग नसून, तो त्यांच्या श्रद्धेचा, विश्वासाचा आणि आत्मिक समाधानाचा एक जिवंत मार्ग असतो. मात्र, बदलत्या काळानुसार समाजासमोरील आव्हाने आणि गरजा बदलल्या आहेत. आजच्या आधुनिक काळात धार्मिक दानाचा पारदर्शक वापर, देवस्थानांमधील उत्तरदायित्व आणि दानाचा प्रवाह मानवी विकासाकडे वळवणे ही काळाची अत्यंत मोठी गरज बनली आहे.

'मानव सेवा हीच खरी ईश्वरसेवा', हा विचार आपल्या संस्कृतीचा गाभा आहे. धर्म, पूजा-अर्चा किंवा धार्मिक विधी हे माणसाला नैतिक मूल्ये आणि आत्मिक शांतता देतात; परंतु धमार्चे अंतिम उद्दिष्ट हे मानवी कल्याणातच दडलेले असते. देवळात जाऊन प्रार्थना करणे जेवढे महत्त्वाचे आहे, त्याहूनही अधिक महत्त्वाचे हे आहे की देवाच्या नावाने दिला जाणारा निधी समाजातील शेवटच्या घटकाच्या अश्रू पुसण्यासाठी वापरला जावा. धार्मिक श्रद्धेची भव्यता केवळ सोन्या-चांदीच्या कलशांत किंवा मंदिरांच्या अथांग वास्तूंत नसून, ती मानवी जीवनात आणलेल्या सकारात्मक बदलात दडलेली आहे. जेव्हा दानाचा थेट उपयोग एखाद्या भुकेल्याला अन्न, आजारी व्यक्तीला औषध आणि गरजू मुलाला शिक्षण देण्यासाठी होतो, तेव्हाच त्या धार्मिक श्रद्धेला खऱ्या अर्थाने पूर्णत्व आणि सार्थक लाभते.

धार्मिक संस्था आणि देवस्थानांमध्ये दरवर्षी अब्जावधी रुपयांचे दान जमा होते. हे दान समाजातील अत्यंत गरीब व्यक्तीपासून ते श्रीमंतांपर्यंत सर्वांनी आपल्या घामाच्या कमाईतून दिलेले असते. त्यामुळे या निधीचा एक-एक रुपया सुरक्षित राहणे आणि त्याचा योग्य विनियोग होणे ही भाविकांची रास्त अपेक्षा असते. दुदैवाने अनेक ठिकाणी दानपेटीतील अपहार, बनावट खरेदी-विक्री आणि प्रशासकीय गैरव्यवहार समोर येतात, ज्यामुळे भाविकांच्या श्रद्धेला मोठा धक्का पोहोचतो. यासाठी दानाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, डिजिटल आणि त्रयस्थ संस्थांकडून तपासली जाणे अनिवार्य आहे. प्रत्येक देवस्थान ट्रस्टने जमा झालेला निधी आणि त्याचा समाजहितार्थ झालेला खर्च याचा वार्षिक हिशोब सार्वजनिक केला पाहिजे. दान जेव्हा भ्रष्टाचारापासून पूर्णपणे मुक्त होते, तेव्हाच लोकांचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो आणि त्या निधीतून मोठ्या सामाजिक प्रकल्पांची निर्मिती होऊ शकते.

'अन्नदान हे एका वेळची भूक भागवते, परंतु विद्यादान हे संपूर्ण आयुष्याला आणि येणाऱ्या पिढ्यांना आकार देते.' अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हा दानाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. ग्रामीण, दुर्गम व हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे आजही कठीण जाते. धार्मिक संस्थांच्या निधीतून शाळा, अद्ययावत संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा आणि समृद्ध वाचनालये (ग्रंथालये) उभारली पाहिजेत. तसेच, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गुणवंत विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट सुटू नये यासाठी शिष्यवृत्ती योजना, मोफत वसतिगृहे आणि अभ्यासिका उपलब्ध करून देणे हे खऱ्या अर्थाने राष्ट्राच्या पुनर्निमार्णाचे कार्य आहे.

शिक्षणासोबतच आरोग्य आणि स्वावलंबन हे मानवी विकासाचे इतर दोन मुख्य आधारस्तंभ आहेत. आजच्या काळात गंभीर आजारांवरील उपचारांचा खर्च सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडवून टाकतो. देवस्थानांनी आपल्या निधीतून अत्याधुनिक रुग्णालये, मोफत औषधोपचार केंद्र, आणि रुग्णवाहिकांची सोय उपलब्ध करून दिल्यास ते लाखो गरजू कुटुंबांसाठी जीवनदायी ठरेल. यासोबतच तरुणांना आणि महिलांना रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, हा समाजातील दारिद्य दूर करण्याचा सर्वात शाश्वत मार्ग आहे.

या विषयावर केवळ चर्चा करणे, लेख लिहिणे किंवा भाषणे देणे पुरेसे नाही; तर हा विचार प्रत्येकाने आपापल्या पातळीवर प्रत्यक्ष कृतीत आणणे आवश्यक आहे. सण, उत्सव, वाढदिवस, किंवा स्मृतीदिनानिमित्त केला जाणारा अवाजवी खर्च, देखावा आणि कर्मकांडांवरील अपव्यय टाळून नागरिकांनी तोच निधी एखाद्या गरजू मुलाच्या शिक्षणासाठी, वाचनालयाला पुस्तके भेट देण्यासाठी किंवा रुग्णाच्या उपचारासाठी वापरला पाहिजे. देवस्थान विश्वस्तांनीही आपल्या मुख्य उद्दिष्टांमध्ये शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा समावेश केला पाहिजे. धार्मिक श्रद्धा ही समाजाला जोडणारी आणि नैतिक बळ देणारी शक्ती आहे. या श्रद्धेला जेव्हा ज्ञानाची, आरोग्याची आणि करुणेची जोड मिळते, तेव्हाच एक सशक्त आणि समृद्ध समाज निर्माण होतो. दानाचा मार्ग जेव्हा भ्रष्टाचारापासून मुक्त होऊन पारदर्शक बनतो आणि त्याचा प्रवाह अज्ञानाचा अंधार दूर करून मानवी विकासाच्या प्रकाशाकडे वळतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाच्या उज्ज्वल भविष्याची निर्मिती होते. हाच खरा धर्म आहे आणि हेच खरे समाजहित आहे.

भारतीय संस्कृतीत दान या संकल्पनेला अत्यंत पवित्र स्थान असून, अनादी काळापासून मानवी मनातील कारुण्य, कृतज्ञता आणि त्याग भावना दानाच्या माध्यमातून तसेच धार्मिक श्रद्धेतून केले जाणारे दान हे केवळ एका विधीचा भाग नसून, तो भाविकांच्या अथांग विश्वासाचा आणि आत्मिक समाधानाचा मार्ग असतो; मात्र बदलत्या काळानुसार या दानाचा आणि श्रद्धेचा समाजाच्या वास्तववादी गरजांशी ताळमेळ बसवणे हेच खऱ्या अर्थाने समाजहिताचे ठरेल. धार्मिक स्थळांवर भाविकांनी अत्यंत प्रामाणिक भावनेने दिलेल्या दानाचा योग्य सन्मान होणे आवश्यक असून, ट्रस्टींनी या निधीचा वापर केवळ मंदिरांच्या भव्यतेसाठी किंवा कर्मकांडांपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक उपक्रमांसाठी करणे गरजेचे आहे. धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा मार्ग असल्याने मानवी विकास साधणे हाच कोणत्याही धर्माचा मूळ उद्देश असायला हवा.

"विद्यादान हेच श्रेष्ठ दान" या उक्तीप्रमाणे अन्नदानामुळे एका वेळची भूक भागू शकते, पणँ विद्यादानामुळे एखाद्याचे संपूर्ण आयुष्य आणि येणाऱ्या पिढ्या उजळून निघतात. त्यामुळे आर्थिक परिस्थितीअभावी शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना मदत करणे, शाळांमध्ये अद्ययावत संगणक कक्ष, ग्रंथालये आणि प्रयोगशाळा उभारणे हा दानाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. यासोबतच गंभीर आजारांच्या उपचारांमुळे कोलमडणाऱ्या कुटुंबांना मोफत रुग्णालये व औषधोपचार केंद्रांद्वारे आधार देणे तसेच महिला व तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनवणे ही काळाची गरज आहे. जेव्हा दानाचा प्रवाह ज्ञानाकडे, आरोग्याकडे आणि सक्षमीकरणाकडे वळतो, तेव्हा समाजातल्या दारिद्य, अज्ञान आणि अंधश्रद्धेचा अंधार दूर होतो. सण, वाढदिवस किंवा स्मृतीदिनानिमित्त केला जाणारा अवाजवी खर्च टाळून एखाद्या गरजू मुलाच्या शिक्षणाचा खर्च उचलणे हा ज्ञानाचा प्रकाश पसरवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. धार्मिक श्रद्धेची भव्यता केवळ सोन्या-चांदीच्या दानात नसून ती मानवी जीवनात आणलेल्या सकारात्मक बदलात दडलेली आहे. निष्ठेला जेव्हा सामाजिक बांधिलकीची आणि ज्ञानाची जोड मिळते, तेव्हाच एक सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर समाज निर्माण होऊन देशाचे भविष्य खऱ्या अर्थाने उज्ज्वल घडते.

"हातात हात घेऊन चला, ज्ञानाची ज्योत उजळत चला; दानातून घडो मानवी सेवा, हाच खरा ईश्वरमेवा.'

थोडक्यात काय तर दानाचा खरा मार्ग म्हणजे केवळ आर्थिक मदत नव्हे, तर श्रद्धा, प्रेम आणि निस्वार्थ भावनेतून मानवाचा सर्वांगीण विकास साधणे होय. जेव्हा श्रद्धा आणि कर्तव्य एकत्र येतात, तेव्हा समाजातील प्रत्येक घटकाचा उद्धार होतो आणि एका उज्ज्वल व शाश्वत भविष्याचा पाया रचला जातो.

- ९५६१५९४३०६

# एक दिवसीय क्रिकेटचा पाचहजारी प्रवास!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

***पुरुष वनडे क्रिकेटचे ऐतिहासिक ५,००० सामने: ५५ वर्षांचा प्रवास, बदलणारे ट्रेंड्स आणि मोठे विक्रम***

जानेवारी १९७१ मध्ये सुरू झालेला पुरुष आंतरराष्ट्रीय एकदिवसीय (वनडे इंटरनॅशनल) क्रिकेटचा प्रवास अखेर ५,००० सामन्यांच्या ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचला आहे. स्कॉटलंड आणि कॅनडा यांच्यातील सामन्याने वनडे क्रिकेटच्या इतिहासात हा नवा अध्याय जोडला गेला. गेल्या ५५ वर्षांत या फॉरमॅटवर अनेकदा प्रश्न उपस्थित केले गेले, काही माजी खेळाडूंनी याला 'बोरिंग' म्हटले, तर काहींनी हा प्रकार बंद करण्याची मागणी केली. तरीही सर्व आव्हानांवर मात करत वनडे क्रिकेटने आपले वेगळे आणि महत्त्वाचे अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

कसोटी (टेस्ट) क्रिकेट १८७७ मध्ये सुरू होऊनही अद्याप ३,००० सामन्यांचा टप्पा गाठू शकलेले नाही (एकूण २,६२८ सामने), तर टि ट्वेंटी आयने २००५ मध्ये सुरुवात करून ४,००० चा आकडा पार केला आहे (एकूण ४,०५९ सामने). पण ५,००० सामने पूर्ण करणारा वनडे हा पुरुष आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिला फॉरमॅट ठरला आहे.

**१,०००-१,००० सामन्यांचे ५ टप्पे: कशी बदलली वनडेची गती**

वनडे क्रिकेटचा ५,००० सामन्यांचा प्रवास १,००० च्या पाच कालखंडात विभागून पाहिल्यास या खेळात झालेला प्रचंड बदल स्पष्ट दिसतो. पहिले १,००० सामने खेळण्यासाठी तब्बल २४ वर्षे लागली (१९७१ ते १९९५). १,००० वा सामना १९९५ मध्ये नॉटिंगहॅम येथे इंग्लंड आणि वेस्ट इंडिज दरम्यान खेळला गेला होता.

दुसरे १,००० सामने पूर्ण होण्यासाठी फक्त ८ वर्षे लागली (१९९५ ते २००३). २००७ मध्ये एका वर्षात सर्वाधिक १९१ वनडे खेळले गेले होते, तर २०२३ मध्ये २१८ सामन्यांसह हा विक्रम मोडला गेला. मात्र, कोरोना महामारी, टी-२० लीगचे वाढते प्रस्थ आणि द्विपक्षीय मालिका लहान झाल्यामुळे शेवटच्या १,००० सामन्यांना ३,०६५ दिवस लागले.

**वाढता स्कोअरिंग रेट आणि धावांचा थरार**

पहिल्या १,००० सामन्यांत पहिल्या डावातील सरासरी धावसंख्या २१३.९० होती, ज्यामध्ये जिंकणाऱ्या संघाची सरासरी २४०.१६ होती. दुसऱ्या टप्प्यात सरासरी २३२.६२ झाली, तिसऱ्या टप्प्यात २४०.४३ आणि चौथ्या टप्प्यात २५०.६८ पर्यंत पोहोचली. पाचव्या टप्प्यात ही सरासरी २४९.९७ राहिली, तर जिंकणाऱ्या संघाची सरासरी २८९.३८ वर पोहोचली.

तसेच चौकार-षटकारांचा पाऊसही वाढला आहे. पहिल्या १,००० सामन्यांत २,७२९ हून अधिक षटकार मारले गेले होते, तर ४,००० ते ५,००० सामन्यांच्या टप्प्यात ९,२७४ षटकार ठोकले गेले. अलीकडच्या १,००० सामन्यांत ३०० किंवा त्याहून अधिक धावांचा स्कोअर ३२१ वेळा झाला, ज्यामध्ये ८६ वेळा ३५० पेक्षा जास्त धावा बनल्या आणि १४ वेळा ४०० चा आकडा पार झाला. धावांचा पाठलाग करताना चेस करणाऱ्या टीम्सनी ९० वेळा ३००+ धावा केल्या, ज्यातील ४४ वेळा यशस्वी पाठलाग केला गेला.

**वेगवेगळ्या युगातील नायक**

वनडेच्या प्रत्येक १,००० सामन्यांच्या टप्प्यात नव्या खेळाडूंनी आपले वर्चस्व गाजवले:

१ ते १,००० सामने (१९७१-१९९५): वेस्ट इंडिजचे डेसमंड हेंस ८,६४८ धावांसह अव्वल फलंदाज होते, तर पाकिस्तानचे वसीम अक्रम २७३ बळींसह अव्वल गोलंदाज होते.

१,००१ ते २,००० सामने (१९९५-२००३): भारताच्या सचिन तेंडुलकरने ९,१४९ धावा करत अव्वल स्थान पटकावले, तर मुथय्या मुरलीधरनने ३०० बळी घेतले.

२,००१ ते ३,००० सामने (२००३-२०१०): ऑस्ट्रेलियाच्या रिकी पाँटिंगने ६,९५४ धावा केल्या आणि ब्रेट लीने २०२ बळी मिळवले. या टप्प्याच्या शेवटी सचिन तेंडुलकरने पुरुष वनडेतील पहिले द्विशतक झळकावले.

३,००१ ते ४,००० सामने (२०१०-२०१८): विराट कोहलीने ८,५३४ धावा केल्या आणि लसिथ मलिंगाने २०४ बळी टिपले.

४,००१ ते ५,००० सामने (२०१८-२०२६): वेस्ट इंडिजच्या शाई होप ५,३९१ धावांसह अग्रस्थानी राहिला, तर ऑस्ट्रेलियाच्या अँडम झॅम्पने १५६ बळी घेतले.

**संघांची कामगिरी आणि वैयक्तिक विक्रम**

ऑस्ट्रेलिया १०२५ सामन्यांत ६१९ विजयांसह वनडे इतिहासातील सर्वात यशस्वी संघ आहे. भारताने सर्वाधिक १०८१ सामने खेळले असून ५७५ विजयांसह ते दुसऱ्या स्थानावर आहेत. परदेशी भूमीवर सर्वाधिक सामना जिंकण्याचा विक्रम पाकिस्तानच्या नावावर असून त्यांनी ७८९ पैकी ३९५ सामने जिंकले आहेत. भारताने परदेशात ६९५ सामन्यांत ३४० विजय मिळवले आहेत.

**वनडेतील महत्त्वाचे वैयक्तिक विक्रमः**

सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्याः रोहित शर्मा (२६४ धावा)

सर्वाधिक षटकारः रोहित शर्मा (३६९ षटकार)

सर्वाधिक चौकारः सचिन तेंडुलकर (२,०१६ चौकार)

सर्वाधिक प्लेअर ऑफ द मॅचः सचिन तेंडुलकर (६२ वेळा)

सर्वाधिक प्लेअर ऑफ द सीरिजः सचिन तेंडुलकर (१५ वेळा)

सर्वाधिक यष्टिरक्षण झेलः अँडम गिलक्रिस्ट (४१७ झेल)

सर्वाधिक यष्टिरक्षण स्टंपिंगः एमएस धोनी (१२३ स्टंपिंग)

**५,००० सामन्यांचा एकूण ताळेबंद**

एकूण ५,००० सामन्यांमध्ये ४,७७७ सामन्यांचा स्पष्ट निकाल लागला, ४७ सामने टाई झाले आणि १७६ सामने अनिर्णीत (नो रिझल्ट) राहिले. या सर्व सामन्यांमध्ये मिळून एकूण २१,५४,२२५ धावा झाल्या आणि ७१,६५२ फलंदाज बाद झाले. ५५ वर्षांचा हा प्रवास दाखवून देतो की, क्रिकेटचे स्वरूप कितीही बदलले तरी ५० षटकांच्या या फॉरमॅटचा उत्साह आणि महत्त्व अजूनही अबाधित आहे.

**वनडे क्रिकेटचा इतिहास, सुवर्ण रेकॉर्ड्स आणि ऐतिहासिक आकडेवारी**

एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात अनेक दिग्गज खेळाडू आणि संघांनी ऐतिहासिक टप्पे गाठले आहेत. सचिन तेंडुलकरच्या शतकांपासून ते विराट कोहलीच्या नव्या विक्रमांपर्यंत, आणि मुथय्या मुरलीधरनच्या फिरकीपासून ते चामिंडा वासच्या विक्रमी गोलंदाजीपर्यंत झ वनडे क्रिकेटने अनेक थरारक क्षण पाहिले आहेत.

दिलेल्या आकडेवारीच्या आधारे वनडे क्रिकेटचे काही प्रमुख पैलू आणि विक्रम खालीलप्रमाणे आहेतः

१. वनडे इतिहासातील ५ मोठे टप्पे ( १ ते ५००० सामने)

वनडे क्रिकेटच्या इतिहासात दर १००० सामन्यांच्या काळात वेगवेगळ्या खेळाडूंनी आपले वर्चस्व गाजवलेः

१ ते १००० सामने (१९७१-१९९५): डेसमंड हॅन्स यांनी सर्वाधिक ८,६४८ धावा केल्या, तर वसीम अक्रम यांनी सर्वाधिक २७३ बळी (विकेट्स) घेतले.

१००१ ते २००० सामने (१९९५-२००३): सचिन तेंडुलकरने ९,१४९ धावा करत अव्वल स्थान पटकावले. याच काळात मुथय्या मुरलीधरनने ३०० विकेट्स पूर्ण केल्या.

२००१ ते ३००० सामने (२००३-२०१०): रिकी पॉटिंगने ६,९५४ धावा केल्या, तर ब्रेट लीने २०२ विकेट्स घेतल्या.

३००१ ते ४००० सामने (२०१०-२०१८): विराट कोहलीने ८,५३४ धावा केल्या आणि लसित मलिंगाने २०४ विकेट्स घेतल्या.

४००१ ते ५००० सामने (२०१८-२०२६): शाई होपने ५,३९१ धावा केल्या आणि ॲडम झॅम्पाने १५६ विकेट्स घेऊन अव्वल स्थान मिळवले.

२. सर्वाधिक धावा करणारे फलंदाज

वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावांचा विक्रम आजही सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे.

१ .सचिन तेंडुलकर (भारत): ४६३ सामने १८४२६ धावा सरासरीः ४४.८३` ४९ शतके ९६ अर्धशतके

२. विराट कोहली (भारत): ३१४ सामने १४९४१ धावा सरासरीः ५८.५९ - ५४ शतके ७९ अर्धशतके

३.कुमार संगकारा (श्रीलंका): ४०४ सामने` १४२३४ धावा सरासरीः ४१.९८` २५ शतके` ९३ अर्धशतके

४.रिकी पॉटिंग (ऑस्ट्रेलिया): ३७५ सामने १३७०४ धावा सरासरीः ४२.०३- ३० शतके ८२ अर्धशतके

५.सनथ जयसूर्या (श्रीलंका): ४४५ सामने १३४३० धावा सरासरीः ३२.३६-२८ शतके- ६८ अर्धशतके

विशेष टिपणः विराट कोहलीने सचिन तेंडुलकरच्या ४९ शतकांचा विक्रम मोडून एकदिवसीय सामन्यांमध्ये ५४ शतके ठोकण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे.

३. सर्वाधिक बळी (विकेट्स) घेणारे गोलंदाज

१.श्रीलंकेचा फिरकीपटू मुथय्या मुरलीधरन वनडे इतिहासातील सर्वात यशस्वी गोलंदाज आहे.

२.मुथय्या मुरलीधरन (श्रीलंका): ३५० सामने ५३४ विकेट्स सर्वोत्तमः ७/३० ५ विकेट्सः १० वेळा

३.वसीम अक्रम (पाकिस्तान): ३५६ सामने ५०२ विकेट्स सर्वोत्तमः ५/१५ - ५ विकेट्सः ६ वेळा

४.वकार युनिस (पाकिस्तान): २६२ सामने ४१६ विकेट्स सर्वोत्तमः ७/३६ - ५ विकेट्सः १३ वेळा

५.चामिंडा वास (श्रीलंका): ३२२ सामने ४०० विकेट्स सर्वोत्तमः ८/१९ - ५ विकेट्सः ४ वेळा

६.शाहिद आफ्रिदी (पाकिस्तान): ३९८ सामने ३९५ विकेट्स सर्वोत्तमः ७/१२- ५ विकेट्सः ९ वेळा

४. वनडेतील सर्वात मोठ्या वैयक्तिक खेळी

वनडे क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा विक्रम भारताच्या रोहित शर्माच्या नावावर आहेः

मार्टिन गुप्टिल (न्यूझीलंड): २३७* धावा (१६३ चेंडू) विरुद्ध वेस्ट इंडिज (२०१५)

वीरेंद्र सहवाग (भारत): २१९ धावा (१४९ चेंडू) विरुद्ध वेस्ट इंडिज (२०११)

क्रिस गेल (वेस्ट इंडिज): २१५ धावा (१४७ चेंडू) विरुद्ध झिम्बाब्वे (२०१५)

फखर जमान (पाकिस्तान): २१०* धावा (१५६ चेंडू) विरुद्ध झिम्बाब्वे (२०१८)

५. एका डावात सर्वोत्कृष्ट गोलंदाजी

एका सामन्यात सर्वोत्तम गोलंदाजीचा २५ वर्षे जुना विक्रम श्रीलंकेच्या चामिंडा वासच्या नावावर आहेः

चामिंडा वास (श्रीलंका): ८/१९ विरुद्ध झिम्बाब्वे (२००१)

शाहिद आफ्रिदी (पाकिस्तान): ७/१२ विरुद्ध वेस्ट इंडिज (२०१३)

ग्लेन मॅकग्रा (ऑस्ट्रेलिया): ७/१५ विरुद्ध नामिबिया (२००३)

राशीद खान (अफगाण): ७/१८ विरुद्ध वेस्ट इंडिज (२०१७)

वानिंदू हसरंगा (श्रीलंका): ७/१९ विरुद्ध झिम्बाब्वे (२०२४)

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# 'भारत माता की जय'च्या गजराने दुमदुमला नागपूर






**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या जयघोषाने नागपूर शहरातील प्रमुख चौक दुमदुमून गेले. निमित्त होते केंद्र शासनाच्या 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या वतीने रविवारी (ता. ९) आयोजित भव्य 'तिरंगा रॅली'चे. क्रांती दिनाचे औचित्य साधत देशभक्तीच्या वातावरणात निघालेल्या या रॅलीने संपूर्ण शहराचे देशभक्तीपर वातावरण निर्माण केले.

रामनगर चौकातील बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यापासून या रॅलीची सुरुवात झाली. महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला मार्गस्थ करण्यात आले. रामनगरहून निघालेली ही रॅली लक्ष्मी भुवन चौक मार्गे शंकर नगर चौकात पोहोचली. या रॅलीचे मुख्य आकर्षण म्हणजे तब्बल ७०० मीटर लांब तिरंगा होता, जो नागरिकांच्या शिस्तबद्ध सहभागाने एका लांब प्रवासात झळकत होता.

देशभक्तीपर सोहळ्यात राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निता ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रा. संजय भेंडे, सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र बाल्या बोरकर परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे लक्ष्मी नगर झोन सभापती तारा यादव, नगरसेविका पूजा पाठक नगरसेवक वीरेंद्र कुकरेजा, योगेश पाचपोर, नगरसेवक सुनिल हिरणवार, माजी नगरसेवक संदीप जाधव, विजय होले, श्रीकांत आगलावे, रितेश गावंडे, विष्णू चांगदे नगरसेवक प्रदीप पोहणे, माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी महापौर दयाशंकर तिवारी, अर्चना डेहणकर, तसेच अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम, शिक्षणाधिकारी वंदना महाजन, क्रीडा अधिकारी डॉ. पीयुष आंबुलकर, उपशिक्षणाधिकारी सुभाष उपासे, एनडीएस पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्यासह इतर मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीची रचना अत्यंत आकर्षक होती. सर्वप्रथम ७०० मीटर लांब तिरंगा हाती घेऊन नागरिक चालत होते, त्यानंतर माजी सैनिक, अग्निशमन जवान, उपद्रव शोध पथकाचे जवान आणि वाल्मिकी नगर हिंदी माध्यमिक शाळा, विवेकानंद हिंदी माध्यमिक शाळा तसेच शिवणगाव मराठी शाळेचे विद्यार्थी विविध वेशभूषेत सहभागी झाले होते.

## हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ७०० मीटर लांब तिरंगा घेऊन शहरात भव्य रॅली

यावेळी पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले संस्कृती नृत्य आणि गुरू तेजबहादुर सिंह साहेब गुरुद्वाराच्या वतीने दाखवण्यात आलेली शस्त्रांची प्रात्यक्षिके विशेष ठरली. तसेच, हातात तिरंगा ध्वज घेऊन स्केटिंग करत रॅलीचे नेतृत्व करणारे कु. अथांग राजगुरू आणि कु. उमंग नितनवरे उपस्थितांचे आकर्षण ठरले. याप्रसंगी बोलताना महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, नव्या पिढीला आपल्या स्वातंत्र्याचे महत्त्व समजावे आणि देशसेवेची भावना रुजावी, यासाठी या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या देशभक्तांचे स्मरण करून देत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'हर घर तिरंगा' मोहिमेबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी ९ ऑगस्ट क्रांती दिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रकाश टाकला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या आंदोलनाची ज्योती नागपुरात कशी प्रज्वलित झाली, याची सविस्तर माहिती त्यांनी उपस्थित नागरिकांना दिली.

थोडक्यात

## जागतिक आदिवासी दिनानिमित्त बाबदेव येथे क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांच्या पूर्णाकृती मूर्तीचे अनावरण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्मितेसाठी केलेला संघर्ष व त्याग आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे आज रविवार (ता. ९ ऑगस्ट) ला जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून बाबदेव येथे तारसा- धामणगाव जि.प.सर्कल बाबदेव येथील भाजपचे नेते व भाजपचे भावी जि.प.सदस्याचे उमेदवार प्रवीण कारेमोरे यांच्या सौजन्याने क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांच्या पूर्णाकृती मूर्तीचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी टेकचंद सावरकर माजी आमदार, कामठी-मौदा विधानसभा, देवेंद्र गोडबोले माजी जि. प. सदस्य नागपूर,विरेंद्र पायतोडे उपाध्यक्ष, भाजयुमो नागपूर जिल्हा ग्रामीण, रामटेक, प्रवीण कारेमोरे भाजपा नेते तारसा-धामणगाव जि प सर्कल, स्नेहल वरखडे सरपंच गट ग्रामपंचायत, बाबदेव, शिवशंकर डांगरे अध्यक्ष, बाबदेव अमोल बावणे बूथप्रमुख, बाबदेव,गणेश वरठे, गंगाधर कुंभरे,आकाश येळणे, संजू वाघमारे, भूषण सावरकर, किशोर डांगरे व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारीही घेणार : सतीश ओरके

### बोधिसत्व सोसायटीतर्फे मातोश्री मैनाबाई हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
गरजू विद्यार्थ्यांना केवळ गणवेश देऊन बोधिसत्व सोसायटीची जबाबदारी संपत नाही. त्यांच्या पुढील शिक्षणासाठीही संस्थेतर्फे सर्वतोपरी आर्थिक मदत केली जाईल. गरीब कुटुंबातील आहोत म्हणून उच्च शिक्षण घेता येणार नाही, असा विचार विद्यार्थ्यांनी मुळीच करू नये, असा विश्वास बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीपर्पज सोसायटीचे अध्यक्ष सतीश ओरके यांनी व्यक्त केला. कुकडे लेआऊट, दक्षिण नागपूर येथील मातोश्री मैनाबाई हायस्कूलमधील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीपर्पज सोसायटीतर्फे गणवेश वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना ओरके यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य केले जात असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.

तसेच नीट, आयआयटी आणि आयएएससारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक ती आर्थिक मदत संस्थेतर्फे करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक राजेंद्र खापरे यांनी बोधिसत्व सोसायटीच्या उपक्रमांचा आढावा घेतला. संस्था गेल्या २० वर्षांपासून स्वनिधीतून गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करीत असून, आतापर्यंत सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळाला आहे. अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात आली असून, त्यातून अनेक विद्यार्थी डॉक्टर, अभियंते आणि अधिकारी झाले आहेत. कोरोना काळात महाराष्ट्र सरकारला एक लाख रुपयांचा निधी तसेच भोजन वितरण करणाऱ्या सामाजिक संस्थांना ५० हजार रुपयांची मदत करण्यात आली होती. यासोबतच दहावीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्नसंचाचे वाटप आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गुणपत्रिका ठेवण्यासाठी फोल्डर देण्याचा उपक्रमही संस्थेतर्फे राबविला जातो, अशी माहिती त्यांनी दिली. यानंतर भीमराव मगरे, शत्रुघ्न चवरे आणि अनुश्री मगरे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे सतीश ओरके, रामचंद्र गेडाम, भीमराव मगरे, शत्रुघ्न चवरे, अनुश्री मगरे, अभय शेवाळे व प्रतिभा मेश्राम उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र खापरे, हर्षद शिरसाम, वैभव सातपुते, अर्चना जाधव यांच्यासह शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हर्षद शिरसाम यांनी केले.

## तारसा – धामणगाव जि प क्षेत्रात 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत तारसा-धामणगाव जि. प. सर्कल अंतर्गत बाबदेव, आजणगाव व कुंभारी येथे वृक्षारोपणाचा



कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला टेकचंद सावरकर माजी आमदार कामठी-मौदा विधानभा क्षेत्र,चिंतामण सारवे सरपंच गट ग्रामपंचायत आजणगाव,विरेंद्र पायतोडे उपाध्यक्ष भाजयुमो नागपूर जिल्हा ग्रामीण, रामटेक,प्रवीण कारेमोरे भाजपा नेते, श्याम नारनवरे अध्यक्ष भाजपा अनुसूचित जमाती आघाडी मौदा तालुका, शिवशंकर डांगरे अध्यक्ष, बाबदेव, अमोल बावणे बूथप्रमुख, बाबदेव, गणेश वरठे, गंगाधर कुंभरे, आकाश येळणे, प्रदीप गोरले तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'फिट इंडिया'चे ब्रँड ॲम्बेसेडर सुबोध गांगुर्डे यांचे नागपुरात ऐतिहासिक स्वागत

### ४३,५११ किलोमीटरचा सायकल प्रवास! मुधोजी राजे भोसले यांनी केले कौतुक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
'फिट इंडिया मूव्हमेंट' चे ब्रँड ॲम्बेसेडर आणि लॉयन्स क्लब ऑफ रोहा चे सदस्य, प्रसिद्ध सायकलपटु रायगड जिल्ह्यातील रोहा गावांचे सुपुत्र सुबोध गांगुर्डे यांचे त्यांच्या 'शक्ती संकल्प सफर' या महा- मोहिमेअंतर्गत नागपूर शहरात आगमन झाले. पर्यावरण संवर्धन आणि 'ड्रग फ्री इंडिया' (व्यसनमुक्त भारत) या उदात्त हेतूने सुरू असलेल्या त्यांच्या या साहसी सायकल प्रवासाचे नागपूरकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल नागपूरकर भोसले राज परिवाराच्या वतीने नागपूर महाराज राजे मुधोजी भोंसले यांनी त्यांचा विशेष सत्कार केला. प्रवासाची सुरुवात १९ जुन २०२४ रोजी जगातील सर्वात उंच आणि हाडे गोठवणाऱ्या 'उमलिंगला पास' (१० हजार फूट उंची) येथून भारतमातेचा तिरंगा हाती घेऊन प्रवासाला सुरुवात.

**अभूतपूर्व टप्पाः** आज त्यांच्या या सलग आणि खडतर प्रवासाचा ७९० वा दिवस असून, त्यांनी आतापर्यंत सायकल ने तब्बल ४३,५११ किलोमीटरचे अंतर पार केले आहे. देशातील तरुणांना आरोग्याचा आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देण्यासाठी सुबोध गांगुर्डे यांनी हे मोठे शिवधनुष्य उचलले आहे. ऊन, वारा, पाऊस आणि अतिशय प्रतिकूल हवामानाचा सामना करत त्यांनी हा पल्ला गाठला आहे. नागपुरात आगमन होताच भोसले राज परिवाराने त्यांच्या या अफाट जिद्दीचे, चिकाटीचे आणि राष्ट्रप्रेमाचे विशेष कौतुक केले.

यावेळी लायन्स क्लब फ्रेंड्सचे विनेश गुजरकर, अजय मंडपे, योगेश घाडगे, क्रीडा भारती संस्थेचे प्रसाद देशपांडे, महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे सचिव अतुल ढगे, राहुल सूर्यवंशी उपाध्यक्ष हाजी सय्यश शब्बीर उर्फ शब्बू भाई, मुख्य प्रवक्ता सारंग ढोक, सदस्य क्रमश अशोक पालकर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना मुधोजी राजे भोसले यांनी आणि उपस्थित मान्यवरांनी सुबोध गांगुर्डे यांचा प्रवास संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, त्यांच्या पुढील प्रवासासाठी आणि संकल्पासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## चौघांच्या जाण्याने पत्रकारितेत भरून न निघणारी पोकळी : राहुल पांडे

### ज्येष्ठ पत्रकारांच्या कार्याला मान्यवरांकडून भावपूर्ण आदरांजली





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
काही माणसे काळाच्या पडद्याआड जातात. पण त्यांची लेखणी आणि त्यांनी समाजासाठी केलेले कार्य पुढेही जिवंत राहते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढता येत नाही. लक्ष्मणराव जोशी, टी.बी.गोल्हर, विराग पाचपोर आणि मिलिंद ठेंगडी हे पत्रकारितेतील तपस्वी होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी दीर्घकाळ जाणवत राहील, असे भावपूर्ण प्रतिपादन राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी केले.

क्रांतिदिनी, ९ ऑगस्ट रोजी टिळक पत्रकार भवन ट्रस्ट, नागपूर श्रमिक पत्रकार संघ आणि पत्रकार क्लब ऑफ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेस क्लब, सिव्हिल लाईन्स येथे चार दिवंगत ज्येष्ठ पत्रकारांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संयुक्त शोकसभा आयोजित करण्यात आली होती. तेव्हा राहुल पांडे बोलत होते. ते पुढे म्हणाले, या चौघांनी आपल्या आयुष्याचा मोठा काळ पत्रकारितेला दिला.

दिवंगत चार पत्रकारांच्या पत्रकारितेतील विविध पैलू आणि त्यांच्या आयुष्यातील निवडक घटनांना ज्येष्ठ पत्रकार सुधीर पाठक, विश्वास इंदूरकर, जोसेफ राव, आमदार संजय भेंडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विजय जावंधिया, किशोर तिवारी, कॉंग्रेसचे प्रफुल्ल गुडधे पाटील, भाजपाच्या प्रगती पाटील, अँड. प्रकाश मेघे आणि डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी उजाळा दिला. प्रेस क्लब व टिळक पत्रकार भवन ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीपकुमार मैत्र यांनी प्रास्ताविकातून, या ज्येष्ठ पत्रकारांच्या कार्याची नोंद पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचे सांगितले. शोकसभेचे संचालन ज्येष्ठ पत्रकार विनोद देशमुख यांनी केले.

यावेळी गोल्हर, जोशी, पाचपोर कुटुंबीय, तसेच महाराष्ट्र टाइम्सचे संपादक अतुल पांडे, ज्येष्ठ पत्रकार शिरीष बोरकर, ब्रह्माशंकर त्रिपाठी, विवेक पुराडभट, चंद्रशेखर जोशी, डॉ. राम ठाकूर, शिव शाहू, अरुण आसटकर, सुनील चोखारे, चंद्रकांत शेन्डे, रंजित देशमुख, देवराव प्रधान, शेखर सोनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## रोहणा पशुधन चोरीने उघडले जलालखेड्यातील 'अनसुलझे' चोरीचे गूढ!

### मेंढ्या-बकऱ्या चोरीत १० आरोपी जेरबंद, आता महाकाली मंदिरातील चोरी-विटंबनेसह जुन्या घरफोड्यांचा तपास लागणार का?, मोटर-केबल, शेती साहित्य चोरीच्या घटनांनी शेतकरी त्रस्त; पोलिसांच्या पुढील तपासाकडे नागरिकांचे लक्ष

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
जलालखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रोहणा येथे मेंढ्या-बकऱ्या चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पदार्फाश करून १० आरोपींना अटक केली आहे. यामध्ये तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग निष्पन्न झाला असून पोलिसांनी ९ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे रोहणा पशुधन चोरीचा गुन्हा उघडकीस आला असला, तरी त्याचबरोबर जलालखेडा परिसरातील मागील काही महिन्यांपासून न उलगडलेल्या चोरीच्या घटनांचा तपासही पुन्हा चर्चेत आला आहे.

जलालखेडा जिल्हा परिषद सर्कलमध्ये मागील काही काळात शेतातील विद्युत मोटर, केबल, शेती साहित्य, मोबाईल चोरी तसेच घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल झाले असले तरी आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागले नसल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

या सर्व घटनांमध्ये सर्वाधिक संवेदनशील घटना म्हणजे जलालखेडा येथील प्रसिद्ध महाकाली मंदिरातील चोरी आणि मूर्ती विटंबना. मंदिरातील देवीचे दागिने चोरीला गेल्याने तसेच मूर्तीची विटंबना झाल्याने भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली होती.

**पोलिस अधीक्षकांनी मंदिरात येऊन दिले होते आश्वासन**

महाकाली मंदिरातील घटनेची गंभीर दखल घेत नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक स्वतः मंदिरात दाखल झाले होते. त्यांनी मंदिराची पाहणी करून मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. या घटनेतील आरोपींचा शोध घेऊन त्यांना लवकरच जेरबंद करण्याचे आश्वासनही त्यांनी मंदिर समितीला दिले होते.

मात्र, अद्याप या प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या हाती लागले नसल्याने मंदिर समिती आणि भाविकांमध्ये नाराजी कायम आहे. त्यामुळे रोहणा पशुधन चोरी प्रकरणातील आरोपींची चौकशी करताना महाकाली मंदिरातील घटना तसेच परिसरातील जुन्या चोरीच्या प्रकरणांचा तपास केला जाणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**रोहणा प्रकरणातील आरोपींची चौकशी ठरणार महत्त्वाची**

रोहणा येथे ३ ऑगस्टच्या मध्यरात्री मारोतराव बांबल यांच्या शेतातील गोठ्यावर चोरट्यांनी धाड टाकली. गोठ्यावर असलेल्या व्यक्तीचे हातपाय बांधून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर ४५ मेंढ्या आणि १६ बकऱ्या पिकअप वाहनातून चोरून नेण्यात आल्या.

घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली. अखेर दहा आरोपी पोलिसांच्या हाती लागले असून तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली वाहने, सात मोबाईल फोन आणि रोख रकमेसह ९ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**'त्या' घटनांचे धागेदोरेही मिळणार का?**

रोहणा प्रकरणातील आरोपींच्या चौकशीतून त्यांच्या पूर्वीच्या हालचाली, संपर्कातील व्यक्ती, चोरीचा माल कुठे विकला जात होता आणि कोणत्या परिसरात ते सक्रिय होते, याची माहिती मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे जलालखेडा सर्कलमधील जुन्या मोटर-केबल चोरी, घरफोडी आणि शेती साहित्य चोरीच्या घटनांशी या आरोपींचा काही संबंध आहे का, याचा तपास करणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेषतः महाकाली मंदिरातील दागिने चोरी आणि मूर्ती विटंबना या गंभीर घटनेचा तपासही नव्याने तपासाच्या कक्षेत आणावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**आता पोलिसांच्या पुढील कारवाईकडे लक्ष**

रोहणा पशुधन चोरीचा तपास उघडकीस आणत पोलिसांनी चांगली कामगिरी केली आहे. मात्र, या कारवाईनंतर जलालखेडा परिसरातील जुन्या व प्रलंबित चोरीच्या घटनांनाही तपासाची दिशा मिळते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. महाकाली मंदिरातील आरोपी कधी जेरबंद होणार? शेतकऱ्यांच्या मोटर-केबल चोरीचा छडा कधी लागणार? घरफोड्यांमागे कोण? रोहणा प्रकरणातील आरोपींच्या चौकशीतून या प्रश्नांची उत्तरे मिळणार का? या प्रश्नांकडे आता जलालखेडा परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

## कोराडी येथे जागतिक आदिवासी दिन समारोह संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, शाखा कोराडी यांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन समारोह रविवारी (दि. ९ ऑगस्ट) संघटनेच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवीण मडावी होते. त्यांच्या हस्ते धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवर व कर्मचारी बांधवांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यानंतर कार्यक्रमास उपस्थित सन्माननीय व्यासपीठावरील प्रवीण मडावी, हर्षद खंडारे, अशोक पेंदोर, मयूर मानवटकर, जुमनाके व मा. विजय बागडे यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात संघटनेचे अध्यक्ष अशोक पेंदोर तसेच सचिव मयूर मानवटकर यांनी मनोगत व्यक्त करून आदिवासी समाजाचा समृद्ध इतिहास, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक योगदान याबाबत विचार मांडले. अध्यक्षीय भाषणात प्रवीण मडावी यांनी जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व विशद करताना आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी उपस्थितांना जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुनील मिसळे यांनी केले. संघटनेच्या पदाधिकारी, कर्मचारी व उपस्थितांच्या सहभागामुळे कार्यक्रम उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला.

## कवडसजवळ अज्ञात वाहनाची धडक, रस्ता ओलांडणाऱ्या ३८ वर्षीय इसमाचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत येणाऱ्या कवडसजवळ रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने



धडक दिल्याने एका ३८ वर्षीय इसमाचा मृत्यू झाला. मृतकाचे नाव अमोल देविदास गेडाम (वय ३८,हरिओम सोसायटी जवळ

रा. वाडी, जिल्हा नागपूर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमोल गेडाम हे रात्रीच्या सुमारास रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली.धडक इतकी भीषण होती की मृतक याचा एक हात आणि पाय फ्रॅक्चर होऊन डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्यांना उपचारासाठी सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना मिळताच त्यांनी तत्काळ सावनेर पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव यांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाल्या आणि जखमी अवस्थेतील अमोल देविदास गेडाम यांना सावनेर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृतक अमोल गेडाम हे बिअर बारमध्ये येणाऱ्या दारूच्या वाहनावर हेल्पर म्हणून कार्यरत होते. दरम्यान, अपघातास कारणीभूत ठरलेले वाहन अद्याप अज्ञात असून सावनेर पोलीस त्या वाहनाचा शोध घेत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू असून, फुटेजच्या आधारे अज्ञात वाहनाचा शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सावनेर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव यांच्या नेतृत्वाखाली सावनेर पोलीस करीत आहेत.

## विश्व आदिवासी जागतिक व क्रांती दिनानिमित्त आमगाव तालुका काँग्रेसतर्फे कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

विश्व आदिवासी जागतिक व क्रांती दिनानिमित्त आमगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. नामदेवराव किरसान यांच्या कार्यालयात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी आदिवासी समाजाच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. आदिवासी समाजाने स्वातंत्र्यलढ्यात तसेच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत दिलेल्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठविण्याची गरज उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

खासदार प्रतिनिधी दुष्यंत किरसान, तालुकाध्यक्ष संजय बहेकार, जिल्हा सचिव इशूलाल भालेकर, जिल्हा उपाध्यक्ष ओबीसी विभाग, ओबीसी शहराध्यक्ष परिवहन विभागाचे जिल्हाध्यक्ष निकेश बाबा मिश्रा,देवकांत बहेकार, महेश उके, अभय ढगे, राधाकिसन चुटे पिंकेश शेंडे, रामेश्वर शामकुवर, रवी रहांगडाले, राहुल चुटे, मुकीम शेख, योगेश कोरे, समीर शेख, उमाकांत उईके, तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रसंतांचे विचार म्हणजे राष्ट्राचा ठेवा : नितीन गडकरी

### सार्थक गुरुदेव सेवा भजनी मंडळने पटकावला विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचा प्रथम क्रमांक





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य आणि विचार हा केवळ विदर्भाचा नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राचा ठेवा आहे. त्यांच्या विचारांनी समाजाला भविष्याची दिशा दिली आहे, असे विचार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा जागर अशा भक्तिमय वातावरणात विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेची महाअंतिम फेरी व बक्षीस वितरण सोहळा रविवारी कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे उत्साहात पार पडली. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

नितीन गडकरी म्हणाले, भजनातील भाव समजून घेऊन त्यातून व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक परिवर्तन घडले पाहिजे, असे सांगून गडकरी म्हणाले, खंजिरी हे केवळ मनोरंजनाचे वाद्य नाही, तर प्रेरणा निर्माण करणारे वाद्य आहे. भजन केवळ मनोरंजनासाठी नसून त्यातून माणसाच्या चरित्रात परिवर्तन झाले पाहिजे.

राष्ट्रसंतांच्या विचारांचा भावार्थ नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी थिंक टँक तयार करण्याची गरज व्यक्त करताना गडकरी म्हणाले की, महाराजांचे विचार घराघरापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाने राष्ट्रसंतांच्या विचारांवर आधारित आदर्श गाव उभारण्याचा संकल्प केला, तर तीच राष्ट्रसंतांना खरी श्रद्धांजली ठरेल. विदर्भातील विविध भागांतून सहभागी झालेल्या भजनी मंडळांनी आपल्या सादरीकरणातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा व्यसनमुक्ती, राष्ट्रभक्ती, मानवता, ग्रामविकास, स्वच्छता आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचविला. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या २५ उत्कृष्ट भजनी मंडळांनी महाअंतिम फेरीत सहभाग घेतला.

सायंकाळी झालेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विजेत्या भजनी मंडळांना रोख पारितोषिके व गौरवचिन्ह प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. गडकरी यांच्या हस्ते बोथे गुरुजींचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी अशोक यावले, ज्ञानेश्वर रक्षक, हेमंत काळमेघ, माजी आमदार सुधाकर कोहोळे, राजेश कुंभलकर, नाना ढगे, विजयालक्ष्मी थोटे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. अनिल सोले यांनी केले. रेणुका देशकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. श्रीरंग वराडपांडे यांनी आभार मानले, तर अशोक यावले यांनी राष्ट्रवंदना सादर केली.

### स्पर्धेचा निकाल

प्रथम क्रमांक – सार्थक गुरुदेव सेवा भजनी मंडळ, हस्तापूर – ५१,०००

द्वितीय क्रमांक – स्वर गुरुकुंजाचे भजन मंडळ, गुरुकुंज आश्रम मोझरी– ३१,०००

तृतीय क्रमांक – आदर्श गुरुसेवा भजन मंडळ, निमगाव – २५,०००

चतुर्थ क्रमांक – श्री गुरुदेव मानव सेवा छात्रालय बाल भजन मंडळ, गुरुकुंज मोझरी – २१,०००

पाचवा क्रमांक – संत बिरबल नाथ भजन मंडळ, मंगरूळपीर – १५,०००

सहावा क्रमांक – साई कृपा भजन मंडळ, न्यू म्हाळगी नगर, नागपूर – ११,०००

सातवा क्रमांक – जय वळेखन माऊली भजन मंडळ, निमकवडा – ७,०००

### उत्तेजनार्थ पुरस्कार – प्रत्येकी ५,००० :

नवचैतन्य बाल भजन मंडळ, आलोडा - सुरसंगम भजन मंडळ, आंबे टेकडी - आदर्श गुरु सेवा मंडळ, शेंदोळा खुर्द - अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ कुही -अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ हिरापूर - अखिल भारतीय गुरु सेवा मंडळ केंद्रीय समिती गुरुकुंज मोझरी तिवसा - गुरुकृपा भजन मंडळ आलोडा - नवयुग गुरुसेवा मंडळ वरुड - गुरुसेवा भजनी मंडळ एकात्मता नगर जयताळा नागपूर - बाल बानिक सेवा भजनी मंडळ गिरड समुद्रपूर

### परीक्षकांचा सन्मान

विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेच्या प्राथमिक व महाअंतिम फेरीतील परीक्षक विजय बोरीकर, नितीन नखाते, विपुल ढोले, प्रशांत भिंगारे, अक्षय सदावर्ते, निलेश सावरकर, दीपिका डाखोरे, रश्मी किन्हीकर, मनीष निलटकर, अनुराधा आसरकर, सीमा सराफ, अनिरूद्ध सुरतेकर, कुणाल पांडे, देवेंद्र यादव, जयंत मंगरूळकर आणि मुकुल पांडे यांचा नितीन गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले यांच्यासह जयप्रकाश गुप्ता, अविनाश घुशे, प्रा. राजेश बागडी, अशोक मानकर, डॉ. गौरीशंकर पाराशर, देवेंद्र यादव, शशांक खेकरे, दीपक खिरवडकर, बाळासाहेब कुळकर्णी, चेतन कायरकर, दिलीप जाधव, संदीप गवई, रेणुका देशकर, भोलानाथ सहारे, विलास त्रिवेदी, अँड. नितीन तेलगोटे, किशोर पाटील, मनीषा काशिकर, विजय फडणवीस, रामभाऊ आंबुलकर, किसन गावंडे, दिलीप गौर, महेंद्र राऊत, गिरधारी निमजे, शैलेश ढोबळे, राजू कनाटे, योगेश बन, डॉ. श्रीरंग वराडपांडे, श्रद्धा पाठक आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### भजन म्हणजे आत्मजागृतीचे साधन : पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी

पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी म्हणाले की, संतांनी ईश्वरप्राप्तीसाठी भजनाचा मार्ग स्वीकारला आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनाच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. तुकडोजी महाराजांसोबत १५ ते २० वर्षे राहण्याचा अनुभव सांगताना त्यांनी त्यांच्या भजनपरंपरेच्या व्यापकतेचा उल्लेख केला. भजन हे आत्म्याचे भोजन आहे. जेव्हा भजनातून आत्म्याचे भोजन होईल, तेव्हा माणूस खऱ्या अर्थाने साधुत्वाकडे वाटचाल करेल, असेही त्यांनी नमूद केले.

# BRDSच्या नव्या अत्याधुनिक वास्तूचे दिमाखात उद्घाटन

### डिझाईन शिक्षणाच्या क्षेत्रात नागपूर नव्या प्रतिभांचे केंद्र बनत आहे : डॉ. भंवर राठौर



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

देशातील आघाडीच्या डिझाईन कोचिंग संस्थांपैकी एक असलेल्या Bhanwar Rathore Design Studio (BRDS) च्या धरमपेठ येथील नव्या आणि अत्याधुनिक वास्तूचे मंगळवारी दिमाखात उद्घाटन करण्यात आले. झेंडा चौक, गजानन महाराज मंदिर रोड येथील या नव्या केंद्राचे उद्घाटन प्रसिद्ध डिझाईन शिक्षणतज्ज्ञ आणि BRDS चे संस्थापक डॉ. भंवर राठौर तसेच BRDS नागपूरच्या संचालिका श्रीमती रीना पांडे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थी, पालक तसेच शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. भंवर राठौर यांनी सांगितले की, NID, NIFT आणि IIT मधील डिझाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे BRDS हे देशातील आघाडीचे डिझाईन कोचिंग नेटवर्क आहे. यंदा BRDS च्या सुमारे २,५०० विद्यार्थ्यांनी NID, NIFT आणि IITमध्ये प्रवेश मिळवला असून, हा संस्थेच्या दृष्टीने उल्लेखनीय टप्पा असल्याचे त्यांनी सांगितले. देशभरात ९१ केंद्रांचे जाळे असलेले BRDS आज भारतातील प्रमुख डिझाईन कोचिंग नेटवर्क म्हणून ओळखले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

नागपूरमधील BRDS च्या प्रवासाविषयी सांगताना डॉ. राठौर म्हणाले की, सुमारे सात वर्षांपूर्वी नागपूर केंद्राची सुरुवात केवळ २० ते २५ विद्यार्थ्यांपासून झाली. त्या काळात विदर्भात डिझाईन शिक्षणाबाबत तुलनेने कमी जागरूकता होती. प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी अनेक विद्यार्थ्यांना अहमदाबाद येथील मुख्य केंद्र गाठावे लागत होते. पालक आणि विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन नागपुरात केंद्र सुरू करण्यात आले. आज धरमपेठ आणि अयोध्यानगर येथे BRDS ची दोन केंद्रे कार्यरत असून, या केंद्रांमधून हजारो विद्यार्थी डिझाईन क्षेत्रातील विविध अभ्यासक्रमांसाठी तयारी करत आहेत.

विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि बदलत्या गरजा लक्षात घेऊन मोठ्या, प्रशस्त आणि आधुनिक सुविधांनी युक्त परिसराची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे धरमपेठ येथील नव्या वास्तूत केंद्र स्थलांतरित करण्यात आले आहे. सध्या नागपूर केंद्रातून ३,००० हून अधिक विद्यार्थी विविध डिझाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांची तयारी करत असल्याची माहिती डॉ. राठौर यांनी दिली.

नागपूरच्या शैक्षणिक आणि पायाभूत विकासाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, मुंबई आणि दिल्लीप्रमाणेच नागपूरही शिक्षण, रोजगार आणि नव्या संधींचे महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने विकसित होत आहे. मेट्रो, सुधारलेली वाहतूक व्यवस्था आणि आधुनिक पायाभूत सुविधांमुळे शहरातील तरुणांचा डिझाईनसह नव्या करिअर पर्यायांकडे वाढता कल दिसून येत आहे.

डिझाईन हे आजच्या तरुणांसाठी पारंपरिक अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणासोबत एक महत्त्वाचे करिअर क्षेत्र म्हणून पुढे येत आहे, असे डॉ. राठौर यांनी सांगितले. कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांमधील विद्यार्थी डिझाईन क्षेत्रात करिअर करू शकतात. संबंधित बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असून, चित्रकला, निरीक्षणशक्ती आणि सर्जनशीलतेची आवड विद्यार्थ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले.

BRDS नागपूर, धरमपेठ केंद्राच्या संचालिका श्रीमती रीना पांडे यांनी सांगितले की, विदर्भात काही वर्षांपूर्वीपर्यंत डिझाईन शिक्षणाबाबत पुरेशी माहिती आणि जागरूकता नव्हती. सर्जनशील क्षमता असलेल्या अनेक विद्यार्थ्यांना करिअरसाठी फाइन आर्ट्स किंवा आर्किटेक्चर यांसारखेच मोजके पर्याय उपलब्ध असल्याचे वाटत होते.

आज परिस्थिती बदलली असून NID, NIFT तसेच IIT मध्ये डिझाईनशी संबंधित विविध अभ्यासक्रम आणि करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. ड्रॉइंग, स्केचिंग, कल्पनाशक्ती आणि डिझाईनिंगची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी डिझाईन हे स्वतःच्या सर्जनशीलतेला करिअरमध्ये रूपांतरित करण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.

विदर्भातील विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार डिझाईन शिक्षण आणि राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांसाठी मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने नागपुरात इफ्छ्र केंद्राची सुरुवात करण्यात आली. गेल्या काही वर्षांत नागपूर केंद्रातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत देशातील प्रतिष्ठित डिझाईन संस्थांमध्ये प्रवेश मिळवला आहे.

नव्या केंद्राच्या वैशिष्ट्यांविषयी बोलताना श्रीमती पांडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि अधिक चांगले शिक्षण वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी नवीन विस्तृत परिसराची निवड करण्यात आली आहे. डिझाईन शिक्षण हे केवळ पुस्तकी किंवा सैद्धांतिक स्वरूपाचे नसून ते प्रात्यक्षिक, प्रयोगशील आणि उपक्रमाधारित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोकळी जागा, आधुनिक सुविधा आणि सर्जनशीलतेला चालना देणारे वातावरण मिळणे महत्त्वाचे आहे.

# 'भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते....'

### कवी ग्रेस यांच्या साहित्यनिर्मितीवर आधारित साजणवेळाने श्रोते भारावले




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कवी ग्रेस यांची स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी अजरामर केलेली 'भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते...' ही रचना सुप्रसिद्ध गायिका मंजिरी अय्यर यांनी सादर करताच श्रोत्यांनी आणि ग्रेसप्रेमींनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. नागपूरचे सुपुत्र आणि लाडके कवी ग्रेस यांच्या साहित्यनिर्मितीवर आधारित 'साजणवेळा' या संगीत-काव्य कार्यक्रमातील दर्जेदार सादरीकरणाने रसिक अक्षरशः भारावून गेले.

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर आणि सप्तक, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिभावंत कवी ग्रेस यांच्या साहित्यनिर्मितीवर आधारित 'साजणवेळा' हा विशेष संगीत-काव्य कार्यक्रम गायत्रीनगर येथील कविकुलगुरू कालिदास सभागृह, पर्सिस्टंट सिस्टिम्स येथे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात अनिरुद्ध जोशी यांनी 'ती आई होती म्हणून घनव्याकुळ मीही रडले' ही भावस्पर्शी रचना सादर केली. विविध रचनांदरम्यान डॉ. विवेक आलोणी यांनी कवी ग्रेस यांच्या कवितांची पार्श्वभूमी, त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये तसेच गीतांचा आशय प्रभावीपणे उलगडून सांगितला. त्यानंतर मंजिरी अय्यर यांनी 'मी अशी बहरले होते' हे गीत सादर केले. त्यापूर्वी डॉ. आलोणी यांनी ग्रेस यांच्या अभिव्यक्तीविषयीच्या विचारांचा वेध घेतला. अभिव्यक्तीबद्दल बांधिलकी असणे आवश्यक असल्याचे ग्रेस यांचे मत होते, तसेच अभिव्यक्तीचे अवमूल्यन होत असल्याची चिंताही त्यांनी व्यक्त केली होती.

यानंतर अनिरुद्ध जोशी यांनी 'कसल्या दुःखाने' हे गीत सादर केले. डॉ. मंजिरी वैद्य यांनी 'कंठात दिशांचे हार', 'दीप पाजळले नेत्री' आणि 'पाऊस आला पाऊस आला' या रचना सादर केल्या. अनिरुद्ध जोशी यांनी 'गंगे गंगे', 'पुरातून येती' आणि 'तुझी माझी प्रीत निराळी' ही गीते सादर केली. 'उठा दयाघन' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

मराठी साहित्यातील अत्यंत संवेदनशील, गूढ आणि वैशिष्ट्यपूर्ण काव्यशैलीचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवी ग्रेस यांच्या निवडक साहित्याला संगीताची साथ लाभल्याने रसिकांना एक वेगळाच कलानुभव मिळाला. निवेदक डॉ. विवेक आलोणी यांनी ग्रेस यांच्या कवितांमधील भावविश्व, शब्दसौंदर्य आणि जीवनदृष्टी स्वतःच्या प्रभावी शैलीतून रसिकांसमोर उलगडली.

कार्यक्रमाला श्रीकांत पिसे, मोरेश्वर दहासहस्त्र आणि ऋग्वेद पांडे यांनी वाद्यसाथ दिली. या कार्यक्रमाची संहिता व संकलन प्रसिद्ध अभिनेते चंद्रकांत काळे यांचे असून संगीत आनंद मोडक यांचे आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे सहायक निदेशक दीपक कुळकर्णी यांनी कलाकारांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उदय गुप्ते यांनी केले. सप्तकतर्फे विकास लिमये, प्रदीप मुंशी, उदय पाटणकर, विलास मानेकर, प्रमोद कळमकर आणि नितीन सहस्त्रबुद्धे उपस्थित होते. १० ऑगस्ट १९८० रोजी सप्तकची स्थापना झाल्यापासून संस्थेच्या विविध उपलब्धींचा आढावा डॉ. उदय गुप्ते यांनी घेतला. त्यांनी प्रास्ताविक करताना सप्तकच्या यशस्वी प्रवासाची माहितीही उपस्थितांना दिली.

थोडक्यात

## जागतिक आदिवासी दिवस साजरा, रायबासा, बिडगाव, जातमखोरा आणि सावलीमध्ये मोठे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यातील रायबासा, बिडगाव, जातमखोरा आणि सावली या गावांमध्ये जागतिक आदिवासी दिन उत्साहात आणि पारंपरिक रीतिरिवाजांसह साजरा करण्यात आला. या निमित्ताने, आदिवासी समाजाच्या सदस्यांनी गावात जातीय ऐक्य आणि हक्कांसाठी घोषणा देत रॅली काढली. रॅलीदरम्यान, "जय आदिवासी, जय बिरसा," "एक बाण, एक धनुष्य, आदिवासी समान आहेत," "सरकारी जमीन आमची आहे," आणि "सरकार राष्ट्राचे शासक आहे, आदिवासी राष्ट्राचे मालक आहेत" अशा घोषणा देण्यात आल्या. या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने महिला, पुरुष आणि मुलांनी सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान, भगवान बिरसा मुंडा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची पूजा करण्यात आली.यानंतर उपस्थित समाज बांधवांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात आदिवासी संस्कृती, सामाजिक ऐक्य आणि नवीन पिढीला त्यांचा इतिहास आणि महापुरुषांच्या विचारांशी जोडण्यावर भर देण्यात आला.

रायबासा येथील सरपंच सोनू रावसाहेब, रवी पातेर्ती, मारुती धुर्वे, अरविंद मारसकोल्हे, मुरलीधर मरस्कोल्हे, व समाज बांधव उपस्थित होते. बिडगावमध्ये उपसरपंच अंकुश आत्राम, श्रीकृष्ण कुंभारे, प्रकाश कुंभारे, मोरेश्वर मसराम, मायाराम मसराम उपस्थित होते. जटामखोरामध्ये रवींद्र उईके, गजानन उईके, दिवाकर उईके, पवन कुंभारे यांच्यासह नागरिकांनी सहभाग घेतला. तर सावली (मो.), दामोदर उईके, रवींद्र सरियम, कमलाकर इरपाची, प्रभू सरियम, अशोक उईके, मधुकर सलामे, शेखर भलावी, भगरथा कुमरे, देवकाबाई सरियम, सोना उईके, व मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## शिक्षकांच्या गरजा निश्चित चाचणीमध्ये सावनेर येथील शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आणि CENTA यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सावनेर येथे शिक्षकांसाठी Teacher Need Assessment (TNA) चे यशस्वी आयोजन शनिवार दिनांक ८ जुलैला करण्यात आले. सावनेर तालुक्यातील ७५ शिक्षकांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली होती. त्यापैकी ७१ शिक्षकांनी गुगल लिंक आधारित ऑनलाइन चाचणीद्वारे यशस्वीपणे सहभाग नोंदविला. महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांतील १३ तालुक्यांची SCERT, पुणे यांच्याकडून TNA साठी निवड करण्यात आली असून, त्यामध्ये सावनेर तालुक्याचा समावेश आहे. शिक्षकांच्या अध्यापनविषयक गरजा, कौशल्ये आणि व्यावसायिक विकासाच्या आवश्यकता जाणून घेण्यासाठी घेण्यात आलेल्या या चाचणीत ४० प्रश्नांसाठी ९० मिनिटांचा कालावधी देण्यात आला होता. गटविकास अधिकारी मनोज कुमार हिरुडकर आणि

गटशिक्षणाधिकारी कश्यप सावरकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण विभाग, पंचायत समिती सावनेर येथील शिक्षण विस्तार अधिकारी पुरुषोत्तम मुंडे, जितेंद्र ठाकरे तसेच तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, सर्व विषय साधनव्यक्ती, विशेष शिक्षक यांनी TNA साठी प्रभावी नियोजन केले. शिक्षकांसाठी शिस्तबद्ध बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, आवश्यक सूचना तसेच तांत्रिक सहकार्याची व्यवस्था करण्यात आली. TNA चाचणीसाठी आवश्यक असलेले तांत्रिक सहकार्य गट साधन केंद्र, सावनेर येथील सर्व विषय साधन व्यक्तींनी वैयक्तिकरित्या केले. ऑनलाइन चाचणीदरम्यान येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करून शिक्षकांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण चाचणी प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. शिक्षकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या गरजा अधिक अचूकपणे ओळखून भविष्यात गरजाधारित व परिणामकारक शिक्षक प्रशिक्षणाचे नियोजन करण्यासाठी TNA उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसाच्या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**
**राजु फुंडे**

दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी गोंदिया जिल्ह्याचे लोकप्रिय नेते व गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष खासदार राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसानिमित्त सालेकसा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे विविध कार्यक्रम घेण्यात आले ज्याचा मध्ये सकाळी १० वाजता ग्रामीण रुग्णालय सालेकसा येथे वृक्षारोपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष डॉ. अजय उमाटे, ग्रामीण रुग्णालय चे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश त्रिपाठी, शांतनू उईके, जिल्हा महासचिव डॉ.हिरालाल साठवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या हस्ते रुग्णांना फळ वितरण करण्यात आले. त्या नंतर सकाळी ११ वाजे नर्मदेश्वर महादेव मंदिर रेल्वे स्टेशन रोड सालेकसा येथे खासदार राजेंद्र जैन यांच्या उदंड



आयुष्य उत्तम आरोग्य व दीर्घायुष्यासाठी अभिषेक पूजन पंडित गोपाल पांडे यांच्या द्वारे करण्यात आले.त्या नंतर सकाळी ११.३० वाजे पासून महिला माता बहिणी यांना १०१ किलो साखर अल्पोहर, लाडू चे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तालुका सालेकसाचे अध्यक्ष डॉ.अजय उमाटे, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे यांच्या नेतृत्वाखाली शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका महिला अध्यक्ष गीता चौधरी, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, माजी जि.प.सदस्य बिसराम चर्जे, महिला शहर अध्यक्ष सुनीताताई थेर, तालुका युवती अध्यक्ष सुषमा ताई राऊत, वरिष्ठ पदाधिकारी रघुदास नागपुरे, योगराज पटले, हिरामण बडोले, दुर्गाताई पटले, शहर उपाध्यक्ष ओमप्रकाश लिल्हारे, तालुका उपाध्यक्ष ध्रुवकुमार हुकरे, तालुका किसान आघाडी उपाध्यक्ष किसनलाल रहांगडाले, दिलीप ढेकवार, ग्राम पंचायत सदस्य जितेंद्र बडोले, ओमप्रकाश जगनीत, महिला आघाडी सदस्य ममताताई बघेले, अरुणाताई लिल्हारे,सीमा बैस, रंभाबाई, कु.प्रियंका ब्राह्मणकर, राहुल जंगेरे, राजा बर्वे, रिषी बैस, संजय ब्राह्मणकर, आणि अन्य पदाधिकारी कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले.

याप्रसंगी नर्मदेश्वर महादेव मंदिर समितीचे सन्माननीय अध्यक्ष छाया गभणे, उपाध्यक्ष अनिता पांडे, सचिव शोभाताई नशिने, सदस्य सुरेखा ताई इळपाते, वंदना कापसे, मीनाताई उके, वंदना मडावी, मीनाताई बावनकर, आरती शर्मा, निशाताई बावनथडे, पिंकी ताई गभणे, रजनीताई असाटी, रुपाली ताई भिमटे, अनिताताई पाथोडे मंजू ताई हेमने, संगीता शिवणकर, रत्नकला ताई मंडारे, सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांचे विशेष सहकार्य सहयोग लाभले. याप्रसंगी माता बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संतोष कापसे, पंडीत गोपाल पांडे, रमेश फरकुंडे, राजू गभणे, अभिजित पाथोडे, प्रणय शर्मा यांचे विशेष सहकार्य, सहयोग लाभले. सालेकसा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व नागरिकांचे, महिला माता बहिणी, पत्रकार बंधूंचे आभार मानण्यात आले.

## खा. राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव; नागरिक व कार्यकर्त्यांची मोठी गर्दी

गोंदियाः- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे नेते तथा नवनिर्वाचित राज्यसभा खासदार राजेंद्र जैन यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी नागरिक, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. वाढदिवसानिमित्त राजेंद्र जैन यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. नवनिर्वाचित राज्यसभा खासदार म्हणून नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतरचा हा वाढदिवस असल्याने कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय म्हणून राजेंद्र जैन यांची राजकीय क्षेत्रात ओळख आहे. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असलेल्या राजेंद्र जैन यांनी विविध सामाजिक तसेच सार्वजनिक उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवला आहे.



## पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत वेशभूषा व समूहगीत उपक्रम साजरे

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

पी एम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत विविध उपक्रम साजरे करण्यात येतात. या शनिवारीला वेशभूषा आणि समूहगीत हा उपक्रम राबविण्यात आला. गटशिक्षणाधिकारी पं. सं. मौदा संकेत मरसकोल्हे यांच्या योग्य नियोजनानुसार मौदा पंचायत समिती अंतर्गत दर शनिवारी प्रत्येक शाळेत विविध उपक्रम साजरे करण्यात येतात.

गटशिक्षणाधिकारी संकेत मरस्कोल्हे प. स. मौदा यांनी पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे शनिवारी आकस्मिक भेट देऊन विविध उपक्रमाची पाहणी केली.



याप्रसंगी मरस्कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.आपल्या मार्गदर्शन पर भाषणात विद्यार्थींना त्यांच्या जीवनात कश्या प्रकारे यश मिळेल, याबद्दल मार्गदर्शन केले. हा उपक्रम राबविणे मागचा हेतू विद्यार्थ्यांना सांगण्यात आला.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे उपस्थित होते.

मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी गटशिक्षणाधिकारी संकेत मरसकोल्हे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी आपल्या मनोगतात शाळास्तरावर विविध उपक्रम कसे साजरे केले जातात याची माहीती गटशिक्षणाधिकारी यांना दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले,राणी लक्ष्मीबाई, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा, सीमेवर रक्षण करणारे सैनिक यांच्या वेशभूषा धारण करून विद्यार्थी शाळेत उपस्थित झाले होते.

यानंतर सर्व वगार्तील विद्यार्थ्यांचे देशभक्तीपर समुहगित साजरे करण्यात आले. देशभक्तीपर गीत सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमा अंतर्गत म्हणून दाखविले. आनंददायी उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये आनंद निर्माण करून या उपक्रमाचा आनंद घेण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद सुधीर खंडाईत,सुधीर कांबळे,राजेश रोहाड , सुजाता बोधले , प्रज्ञा रामटेके ,संगीता कारेमोरे ,पुष्पलता उके,उमेश उके, कैलास फटिंग यांनी सहकार्य केले. आभार राजेश रोहाड सर यांनी केले.

## आरोग्यवर्धिनी केंद्राच्या आवारातच अस्वच्छता, नागरिकांचे आरोग्य धोक्यात!



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड - मनिष शिंगणे**

***उमरेड नगर परिषद प्रभाग ११ मधील प्रकार; कंत्राटदाराच्या निष्काळजीपणावर स्थानिक नगरसेविका कल्याणी गजभिये यांची आक्रमक भूमिका***

नागरिकांच्या प्राथमिक उपचारासाठी नगर परिषद प्रभाग ११, गृह निर्माण योजना, इतवारी पेठ, उमरेड येथे नव्यानेच 'नागरी आयुष्मान आरोग्यवर्धिनी केंद्र' सुरू करण्यात आले आहे. मात्र, रुग्णांना आरोग्यसेवा पुरवणाऱ्या या केंद्राच्याच परिसरात सध्या अस्वच्छता, खुले खड्डे आणि उघड्या पाईपलाईनमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे नागरिक व लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**सुरक्षितता वाऱ्यावर -डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती**

आरोग्य केंद्राच्या आवारात सेफ्टी टँकची पाईप लाईन उघडी सोडण्यात आली असून बाजूलाच मोठा खड्डा खोदून ठेवण्यात आला आहे. पावसाचे पाणी या खड्ड्यात साचल्यामुळे डास आणि कीटकांची मोठ्या प्रमाणावर पैदास ,उत्पत्ती होत आहे. त्यातच सततच्या पावसामुळे परिसरात गवत आणि कचरा वाढलेला असून साथीचे आजार पसरण्याची तीव्र शक्यता निर्माण झाली आहे.

**परिसरात दररोज शेकडो नागरिकांची वर्दळ**

याच परिसरात मोठे क्रीडा मैदान, ग्रीन जिम, लहान मुलांसाठी खेळण्याची जागा आणि ज्येष्ठांसाठी गट्टू (पेव्हर ब्लॉक) लावलेला वॉकिंग ट्रॅक आहे. त्यामुळे दररोज सायंकाळी महिला, पुरुष, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक येथे मोठ्या संख्येने येतात. तसेच जवळच नगर परिषद इतवारी प्राथमिक शाळा आणि मोठा रहिवासी परिसर आहे. अशा गजबजलेल्या ठिकाणी उघडे खड्डे आणि अस्वच्छता असल्याने मोठा अपघात घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**दररोज ७० ते ८० रुग्ण घेतात लाभ**

या प्राथमिक आरोग्य केंद्रात १ डॉक्टर, १ परिचारिका ,नर्स आणि ३ इतर कर्मचारी कार्यरत असून दररोज तब्बल ७० ते ८० रुग्ण उपचारासाठी येतात. एकीकडे नागरिक आरोग्याच्या उपचारासाठी येथे येत असताना, दुसरीकडे केंद्राच्या बाहेरच आजारांना आमंत्रण देणारी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची मागणी**

सदर धोकादायक खड्डे तातडीने बुजवण्यात यावेत, सेफ्टी टँकची पाईप लाईन व्यवस्थित बंद करावी आणि परिसरातील साचलेला कचरा व गवत साफ करून औषध फवारणी करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक सामाजिक कार्यकर्ता सुरेश गजभिये व नगरसेवक जितेंद्र रेवतकर यांनी नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे.

नगर परिषद प्रशासनाने काम करण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदाराने याच ठिकाणी मनमानी पद्धतीने खोदकाम करून मुरूम आणि मातीचा वापर बांधकामासाठी केला आहे. कंत्राटदाराच्या या अयोग्य कामामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

**- सौ. कल्याणी सुरेश गजभिये, नगरसेविका**

# मकडधोकडा धरण परिसरात पोलिसांचा दणका!

### मद्यपी व अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांवर कडक कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या मकडधोकडा धरण परिसरात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष आणि धडक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न विचारात घेऊन पोलिसांनी धरण परिसरात अचानक नाकेबंदी करत तपासणी सुरू केली आहे.

**ड्रंक अँड ड्राईव्ह तपासणी**

दारू पिऊन वाहने चालवणाऱ्या चालकांना ब्रेथ अनालायझर उपकरणाद्वारे तपासले जात आहे. धरण परिसरात उघड्यावर दारू पिणाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई. गांजा आणि इतर ड्रग्ज,अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या संशयितांची सखोल चौकशी व कारवाई.

**पोलीस प्रशासनाचा सज्जड इशारा**

नियमांचे पालन करावे, कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी होऊ नये, हुल्लडबाजी, मद्यपान किंवा नियमभंग करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.धरण परिसर हा कुटुंबासह येणाऱ्या पर्यटकांसाठी सुरक्षित आणि शांत राहावा हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहील.

**-धनाजी जळक**
**पोलिस निरीक्षक**
**पोलीस स्टेशन, उमरेड**

# जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेत मोठी खळबळ!

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जिल्हा परिषदेकडून चौकशी समिती

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

नागपूर जिल्ह्यातील सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत च्या कळमेश्वर तालुक्यातील मौजा धापेवाडा बु. येथील जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेबाबत गंभीर तक्रारींची दखल घेत अखेर जिल्हा परिषद नागपूर प्रशासनाने चौकशी समिती गठित केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानंतर आणि




विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या कार्यालयीन आदेशानुसार पाच सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये पंचायत समिती काटोलचे गटविकास अधिकारी सचिन सूर्यवंशी यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली असून संबंधित विभागातील अभियंते व अधिकारी सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

विशेष म्हणजे या चौकशीसाठी तत्कालीन उपअभियंता योगेश इंगळे, तत्कालीन सहायक अभियंता रणदीप रामटेके, ग्रामपंचायत धापेवाडा बु. चे सरपंच-सचिव, ग्रामपंचायत सदस्य दिवाकर कडू तसेच कंत्राटदार मे. विलास पाटील अँड असोसिएट्स यांना उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रकरणातील जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

चौकशी समितीला सर्व अभिलेखांची पडताळणी करून सात दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जलजीवन मिशनसारख्या कोट्यवधी रुपयांच्या योजनेत अनियमितता झाल्याच्या आरोपांमुळे या चौकशीकडे संपूर्ण नागपूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

आता चौकशी अहवालात नेमके कोणते धक्कादायक निष्कर्ष समोर येतात, दोषींवर कारवाई होते का आणि ग्रामस्थांना न्याय मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ही चौकशी जलजीवन मिशनमधील कथित गैरव्यवहार उघडकीस आणणारी ठरणार का, याची उत्सुकता वाढली आहे.

## कमलादेवी प्रेमनारायण मंत्री यांचे निधन



सुनील, अनिल, बालकिशन, अखिल, निखिल आणि कन्हैया मंत्री यांच्या मोठ्या आई कमलादेवी प्रेमनारायणजी मंत्री (९३) यांचे रविवारी, ९ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झाले. मोक्षधाम घाटावर अंत्यसंस्कार पार पडले. त्याच्या कुटुंबीयांनी त्याच्या डोळ्यांची तपासणी केली.